# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 16 January 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक १६ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.**

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इस्रोनं स्पेस डॉकिंग प्रयोगाअंतर्गत उपग्रहांचं डॉकिंग यशस्वीरित्या पूर्ण केलं आहे. इस्रोनं सामाजिक माध्यमावर ही घोषणा केली. या तंत्रज्ञानात यश मिळवणारा भारत जगातला चौथा देश बनला आहे. उपग्रहांच्या अंतराळ डॉकिंगच्या यशस्वी प्रात्यक्षिकासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रोच्या शास्त्रज्ञांचं अभिनंदन केलं आहे. येत्या काही वर्षांमध्ये भारताच्या महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहिमांसाठी ही एक महत्त्वाची पायरी असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

****

सिंगापूरचे अध्यक्ष थरमन षण्मुगरत्नम भारत दौऱ्यावर आले असून, राष्ट्रपती भवनात आज त्यांचं औपचारिक स्वागत करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचं स्वागत केलं. पंतप्रधान मोदी आणि षण्मुगरत्नम यांच्यात आज द्विपक्षीय चर्चा होणार आहे.

****

मुंबई, चेन्नई, कोलकाता, बंगळुरु, हैदराबाद, कोचिन आणि अहमदाबाद विमानतळांवर जलदगती इमिग्रेशन म्हणजे देशप्रवेश प्रवासी विश्वास यंत्रणेचं उद्घाटन आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. या यंत्रणेमुळे प्रवाशांना जागतिक दर्जाच्या इमिग्रेशन सुविधा मिळणार आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रवास सहज आणि विनाअडथळा होण्यासाठी मदत होणार आहे. या प्रणालीची अंमलबजावणी देशातल्या २१ विमानतळांवर केली जाणार आहे.

****

प्रयागराज इथं कुंभमेळ्यात आज भव्य सांस्कृतिक महाकुंभ होत आहे. यामध्ये विख्यात कलाकार भारतीय संस्कृतीची समृद्धी दर्शवणारे कला प्रकार सादर करत आहेत. गंगा पंडालमध्ये होत असलेल्या मुख्य व्यासपीठावर प्रसिद्ध गायक शंकर महादेवन यांचं विशेष सादरीकरण होणार आहे. आज यमुना आणि सरस्वती मंडळांमध्ये, तर २१ जानेवारीपासून त्रिवेणी पंडालमध्ये कार्यक्रम सुरू होतील.

दरम्यान, या मेळ्यात सरकार एकूण स्वच्छता तसंच भाविकांसाठी स्वच्छ आणि दर्जेदार जेवण पुरवण्यावर विशेष लक्ष देत आहे. या भव्य आणि दिव्य कुंभमेळ्यानं जगभराचं लक्ष वेधून घेतलं असून यात भाग घेण्यासाठी दहा देशांच्या एकवीस सदस्यांचं पथक आज संगमावर पवित्र स्नान करणार आहे.

****

देशांतर्गत व्यवसायाला आणि नव्या व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारनं सुरु केलेल्या स्टार्ट अप उपक्रमाला आज नऊ वर्ष पूर्ण झाले. तंत्रज्ञानावर आधारित उपायांपासून ते ग्रामीण नवोपक्रमांपर्यंत, आरोग्यसेवेतील प्रगतीपासून ते बायोटेक प्रगतीपर्यंत, फिनटेक ते एडटेक, स्वच्छ ऊर्जा ते शाश्वत तंत्रज्ञानापर्यंत, भारतीय स्टार्टअप्स रोजगाराच्या संधी निर्माण करत आहेत आणि स्वावलंबी होण्याच्या प्रयत्नांना चालना देत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. आजचा भारत गतिमान, आत्मविश्वासपूर्ण असून भविष्यासाठी सज्ज आहे, हे स्टार्ट अप इंडियाचं गेल्या नऊ वर्षाचं यश दर्शवतं, असं ते म्हणाले. प्रत्येक स्वप्नाला उभारी देणाऱ्या आणि आत्मनिर्भर भारतासाठी योगदान देणाऱ्या स्टार्टअपला चालना देण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं.

****

दरम्यान, पंतप्रधान येत्या रविवारी १९ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११८ वा भाग आहे.

****

जलप्रदूषण आणि काँक्रिटीकरणामुळे नाशिकमध्ये गोदावरी नदीचं आरोग्य बिघडलं असून, गोदावरी स्वच्छ राहण्यासाठी नागरिकांनी मोठा लढा उभारावा, असं आवाहन, जलतज्ज्ञ राजेंद्र सिंह यांनी केलं आहे. नाशिक मध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित, गोदावरी आणि तिच्या उपनद्यांचे भवितव्य गोदावरी आणि सिंहस्थ कुंभमेळ्याचे भविष्यातील स्वरूप' या विषयावरील पर्यावरण प्रेमी नागरिकांच्या जलसंवाद कार्यक्रमात ते काल बोलत होते. देशभरातल्या नागरिकांचं श्रद्धास्थान असलेला गोदा घाट म्हणजेच रामकुंड हा तरण तलाव बनला आहे, त्याला पुन्हा रामकुंड बनवण्यासाठी नाशिककरांनी पुढाकार घ्यावा, असंही त्यांनी सांगितलं. शासनाकडून मिळणारा १५ हजार कोटीचा निधी नदी परिसरातल्या सुशोभीकरणावर खर्च न होता, नदीचा प्रवाह स्वच्छ आणि प्रदूषण मुक्त ठेवण्यासाठी खर्च व्हावा असं ते म्हणाले. दरम्यान अध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर यांच्या उपस्थितीत काल गोदाकाठी गोदावरी पूजन आणि महाआरती करण्यात आली. गोदावरी नदीचा प्रवाह शुद्ध ठेवून प्रदूषण रोखण्याचा आवाहन रविशंकर यांनीही नागरिकांना केलं.

****

मुंबई – अमरावती, पुणे – अमरावती वंदे भारत एक्स्प्रेस सुरु करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनानं घेतला आहे. आतापर्यंत राज्यात पुणे आणि मुंबई इथून वंदे भारत रेल्वे धावत होत्या. मुंबईहून धावणाऱ्या वंदे भारत गाड्या सोलापूर, शिर्डी, गोवा, कोल्हापूर शहरांमध्ये जातात.

****